Celebrating Cinema
Pune International Film Festival

**१८ व्या पिफ अंतर्गत आज सोमवार दि. १३ जानेवारी रोजी झालेल्या पत्रकार परिषदांमधील महत्त्वाचे मुद्दे -**

पुणे फिल्म फाउंडेशन आणि महाराष्ट्र शासनाच्या संयुक्त विद्यमाने सुरु असलेल्या १८ व्या पुणे आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात आज सोमवार दि. १३ जानेवारी, २०२० दरम्यान झालेल्या पत्रकार परिषदांमधील महत्त्वाचे मुद्दे खाली देत आहोत. आज महोत्सवाचे कलात्मक दिग्दर्शक समर नखाते यांनी पत्रकार परिषदेसाठी उपस्थित दिग्दर्शक व निर्माते यांच्याशी संवाद साधला.

चित्रपट - बोन्साय

उपस्थिती- समीर आशा पाटील (दिग्दर्शक, लेखक), संजय झंकार (निर्माता), गौरव पोंक्षे (चलचित्रकार, निर्माता)

ही कथा एका वृद्ध व्यक्ती भोवती फिरते. जे इच्छा नसतानाही खेडे गावातून शहरात राहायला येतात. मात्र तेथील जीवनशैली, राहणीमान आणि कृत्रिमता या कशाशीच जुळवून घेऊ शकत नाहीत. या सगळ्यात मात्र त्यांच्या नातीशी झालेली मैत्री आणि भावनिक गुंतवणूक त्यांना शहरात राहायला भाग पडते. परंतु पोळा सण साजरा करायला मात्र गावाकडे जायचे ते ठरवतात. या गोष्टीला नात विरोध करते. मग गावाकडची ओढ व नातीविषयीचे प्रेम या द्वंदात ते सापडलेले असताना नाराजीनेच का असेना, शहरात राहतात.

- दिग्दर्शकाचा स्वतःचा प्रवास गाव ते मुंबईसारखे मोठे शहर असा झाला आहे. त्यामुळे या प्रवासात स्वतःत खूप बदल झाल्याचे त्यांना जाणवले. ‘आताचा मी आणि पूर्वीचा मी शोधताना जाणवलेल्या गोष्टींतून या कथेचा जन्म झाल्याचे’, दिग्दर्शक समीर पाटील यांनी सांगितले.
- गावातला निसर्ग, चालीरीती, रूढी-परंपरा आणि याउलट शहरातील धावपळ, अनेक कृत्रिम, तांत्रिक गोष्टींचा व्यापक आवाका याची सांगड घालणे खूप कठीण होते. अशा वेळी आपण कधी स्वतःच्या तर कधी अनेकांच्या मुळ्या आवळत एक वेगळ्या प्रकारचा बोन्साय समाज घडवत आहोत, असे मत समीर यांनी व्यक्त केले.
- “त्यामुळे आयुष्य बेरंग झाले आहे. मात्र प्रेम ही संकल्पना जेथे फुलते तेथे आजही रंग आहेत. म्हणून संपूर्ण चित्रपट कृष्णधवल असला तर शेवट मात्र रंगीत केला आहे. चित्रपटात फार काही संवाद नसून खऱ्या अर्थाने चित्रपट बनविण्याचा प्रयत्न आहे. शांततेतील संवाद हा कधीही उच्च असतो. मात्र शहरात शांतता, कुजबूज या गोष्टी लुप्त होत आहेत असे जाणवते.” असेही ते म्हणाले.

- सिनेमा समाज बदलू शकत नाही, पण विचार करायला भाग पाडतो. त्यामुळे येथे केवळ परिस्थिती मांडून मोकळे होता येणार नाही तर भविष्याचा विचार होणेही आवश्यक आहे. सध्याच्या काळात पर्यावरणाबरोबरच आपल्या विचारांमध्येही प्रदूषण झाले आहे याचाही विचार होणे आवश्यक असल्याचेही ते म्हणाले.

२. चित्रपट - वाय

उपस्थिती- डॉ. अजित वाडीकर (दिग्दर्शक, लेखक), नंदू माधव (अभिनेता), स्वप्नील सोजवळ (सहदिग्दर्शक, सहलेखक), राकेश भिलारे (चलचित्रकार)

'वाय' हा चित्रपट स्त्रीभ्रूण हत्त्येवर आहे. चार वेगवेगळ्या कथानकांना जोडत हा सामाजिक समस्येचे पैलू उलगडत जाणारा चित्रपट आहे. यातील एका गोष्टीत एका महिलेचा या सगळ्या दुष्ट प्रवृत्तींविरुद्धचा, समजाविरुद्धचा लढा आहे.

- चित्रपटात चार मुख्य कथा असून त्यांना एका सूत्रात बांधणारा केंद्रबिंदू म्हणजे हॉस्पिटल आहे. त्यामुळे हा चित्रपट अनेक स्तरांतून जातो. यातील दोन कथांमध्ये स्त्रीभ्रूण हत्येचे मागणी, एकात समजातून होणारा पुरवठा आणि एकात या सगळ्याला थांबवू पाहणारी संस्था अशा प्रकारचा आशय मांडण्यात आला आहे.
- कथा काल्पनिक असल्या तरी त्या मनाला भिडतात, एका पातळीवर तुम्हाला सुन्न करतात आणि पुन्हा विचार करायलाही भाग पडतात. विषय गंभीर असला तरी प्रेक्षकांचे मनोरंजनही हा चित्रपट करत असल्याचे वाडीकर यांनी सांगितले.
- आशयघन चित्रपट बऱ्याचदा महोत्सवापुरते मर्यादित राहतात असे वाटते. मात्र त्याचे पडसाद काही काळाने का असेना आपल्याला दिसतातच. ती संकल्पना पुन्हा नव्या रुपात समोर येते आणि समाजापर्यंत नक्कीच पोहचते. असे चित्रपट प्रेरणादायी नक्कीच ठरतात, असे अभिनेता नंदू माधव यांनी सांगितले.

३. चित्रपट - तुझ्या आईला

उपस्थिती - सुजय डहाके (दिग्दर्शक), मेघना प्रामाणिक (निर्माता)

वडिलांच्या सरकारी नोकरीच्या नियमित बदलीमुळे अविनाश शहरातून एका दुर्गम भागातील खेड्यात बदली होऊन जातो. तेथे गेल्यावर शाब्दिक हिंसेच्या खेळात तो अडकतो. या संकल्पनेच्या भोवती 'तुझ्या आईला' हा चित्रपट फिरतो.

- शिवी देणे किंवा शब्दांनी इजा पोहचविणे ही गोष्ट फार सामान्य समजली जाते. शारीरिक हिंसे विषयी खूप बोलले जाते मात्र शाब्दिक हिंसे विषयी मराठीत तरी अजून कोणी बोललेले नाही. म्हणून या संकल्पनेवर चित्रपट बनविण्याचे ठरवल्याचे दिग्दर्शक सुजय डहाके म्हणाले. “यामागे माझा एक वैयक्तिक अनुभव विशेष कारणीभूत ठरला. मी चित्रपट दिग्दर्शित करत असताना जर कोणी काम नीट नाही केले तर मी लगेच त्याला शिवी हासडत असे. त्यामुळे काम पटकन होते असे माझ्या लक्षात आल्यावर ती माझी सवय झाली. पण माझ्या पहिल्या चित्रपटाच्या वेळी अशीच कोणाला दिलेली शिवी त्या व्यक्तीने लक्षात ठेवली आणि ७ वर्षाने त्या व्यक्तीला भेटल्यावरही त्याच्या मानत माझी तीच प्रतिमा आहे हे माझ्या लक्षात आल्यावर मला खूप वेदना झाल्या. आपल्या नकळतही आपण किती हिंसा करतो हे जाणवल्यावर त्यावर काहीतरी करण्याच्या जाणीवेतून हा चित्रपट तयार झाला.”
- खेड्यात, होस्टेलमध्ये अशा शिव्या देण्याचा खेळ खेळला जातो. बरेच शिक्षकही मुलांशी बोलताना अशाच पद्धतीच्या भाषेचा वापर करतात. त्यामुळे या शाब्दिक हिंसेचे धडेही शाळेतूनच मुले गिरवू लागतात. याविषयी विचार होणे ते थांबणे आवश्यक आहे. त्यामुळे चित्रपटात अशी शाब्दिक व शारीरिक हिंसा काही प्रमाणात दाखविली असली तरी शेवटी संदेश अहिंसेचा दिला आहे, असेही डहाके म्हणाले.
- शिवाय हा चित्रपट स्त्रीवादाकडे झुकणारा असून शिवी कायम आई आणि बहिणीवरूनच का असते? असा सवालही विचारतात.
- शाळा चित्रपट ‘पिफ’ मध्ये दाखवला गेला होता त्यानंतर परत ‘पिफ’ मध्ये यायला ९ वर्ष लागली. मात्र यंदा तरी आपला चित्रपट या महोत्सवात पोहचू शकल्याचा आनंद सुजय डहाके यांनी व्यक्त केला.

फोटो ओळ

१) ‘वाय’ चित्रपट फोटो (डावीकडून) राकेश भिलारे, स्वप्नील सोजवळ, नंदू माधव, डॉ. अजित वाडीकर.

ऽ२) ‘तुझ्या आईला’ चित्रपट फोटो - (डावीकडून) मेघना प्रामाणिक, सुजय डहाके, समर नखाते.